॥ श्रीराम ॥

# समर्थांची समर्थ विचार सूत्रे

डॉ. माधवी महाजन
madhavimahajan17@gmail.com

भारतीय संस्कृतीत पूर्वीपासूनच मानवी मनाचा, शरीराचा आरोग्याचा , विश्वाचा, निसर्गाचा तसेच जगण्यासंबधीच्या नियमांचा असा सर्वांगीण अभ्यास झाला आहे. आनंदी जीवन कसे जगावे याचा मूलमंत्र भारतीय संस्कृतीने दिला आहे. भारतीय संस्कृतीत अव्दैताला महत्व दिले आहे. अव्दैत म्हणजे माझ्यासारखाच दुसरा आहे ही भावना. अव्दैताला महत्व देऊन विश्वावर आपलेपणाने प्रेम करा अशी व्यापक विचारांची शिकवण भारतीय संस्कृतीने दिली. भौतिक जगात जगताना खरे सुख, शाश्वत सुखाच्या उगमापर्यंत पोहोचवणारी विचारधारा या संस्कृतीने दिली. ॠषीमुनींनी शाश्वत सुखाची प्रचिती घेतली आणि हा आनंद सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत राहीले. ते केवळ अव्दैतात रमले नाहीत तर सर्व जगाशी एकरुप झाले.

शाश्वत सुखाचा मार्ग मनुष्याला वेदांनी दाखविला. भगवद्गीतेत श्रीकृष्णाने तो उलगडून दाखविला आणि भारताला लाभलेल्या संत परंपरेने तो मार्ग सामान्य माणसाला सोप्पा करुन दाखविला. आजच्या २१व्या शतकात देखील संतांचे विचार, त्यांचे साहित्य, एखाद्या दिपस्तंभाप्रमाणे आपल्याला मार्गदर्शक ठरते. या संत वाङ्मयामध्ये समर्थ रामदासस्वामी यांचा श्रीमद दासबोध हा ग्रंथ प्रापंचिकांसाठी, राजकीय व्यक्तींसाठी, साधकांसाठी, तसेच रोजच्या व्यवहारासाठी देखील अत्यंत उपयुक्त ठरतो. सर्वात महत्वाचे म्हणजे व्यक्ती विकासाच्या दृष्टीने या ग्रंथाचे महत्व अनन्य साधारण आहे. त्यांचे विचारधन प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीत उपयुक्त आहे. मानवी

मन हे अत्यंत चंचल आहे पण या मनाचा, प्रवृत्तीचा समर्थांनी सखोल अभ्यास केला असल्याचे त्यांच्या विचार सूत्रांमधून आपल्या प्रत्ययास येते.

श्रीमद दासबोध, २० दशक आणि २०० समास असे स्वरुप असणाऱ्या या ग्रंथात ७७५१ ओव्या आहेत. प्रत्येक दशकातील १० समासांमध्ये एक सूत्र पकडून समर्थांनी तो विषय विस्ताराने मांडला आहे. स्तवनाने प्रारंभ करुन समर्थ आत्मज्ञानाच्या खोल गाभ्यापर्यंत आपल्याला घेऊन जातात. प्रपंचापासून ब्रह्मऐक्य साधण्यापर्यंतचे सर्व विषय समर्थ या ग्रंथात हाताळतात. अध्यात्मशास्त्राच्या या ग्रंथामध्ये मानवी जीवाचा उध्दार हा प्रधान हेतू दिसून येतो.

भारतीय तत्वज्ञान मानवी जीवनातील अज्ञान दूर होऊन त्याच्या जीवनात त्याला पूर्णत्व कसे प्राप्त करुन घेता येईल याचा पाठपुरावा करते. समर्थांचा श्रीमद दासबोध हा ग्रंथ आदर्श मानवी जीवन कसे असावे याचे मौलिक मार्गदर्शन घडवतो. माणसाला परमेश्वराने अनेक दैवी गुणांनी युक्त असे घडवले. मानवी देह घडवताना २६ दैवी गुण आणि फ़क्त ६ च असुरी गुण देवाने या नरदेहाला बहाल केले. या गुण अवगुणांचे फ़ायदे तोटे कसे आहेत या गुणांचा योग्य वापर करुन उत्तम व्यक्तिमत्व कसे घडु शकते या विषयी समर्थ अनेक समासामधुन मार्गदर्शन करतात.

या दैवी गुणांपैकी एक म्हणजे आपल्याला प्राप्त झालेले वाणीचे सामर्थ्य. शारदास्तवनाच्या समासामध्ये शारदामातेचे स्तवन करुन समर्थांनी आपण मांडलेल्या ग्रंथ प्रपंचासाठी उत्तम शब्दसामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून आशीर्वाद मागुन घेतला आहे. वाणीचे महत्व दासबोधाप्रमाणे समर्थांनी मनाच्या श्लोकात देखील स्पष्ट केले आहे,

स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकांसी रे निववावे ।

लोकसंग्रहाच्या दृष्टीने समर्थांनी वाणीचे महत्व वारंवार स्पष्ट केले आहे. आजच्या युगात देखील कामाच्या ठिकाणी "टिमवर्क" असते तेव्हा

परस्परांच्या सहाय्याने कोणतेही काम पूर्णत्वाला जात असते. अशावेळी एकमेकांना समजावून घेऊन कोणाचे मन न दुखावता काम करणे गरजेचे असते. आपली वाणी जर गोड असेल, दुसऱ्याला जाणून घेण्याची क्षमता असेल तर अशा व्यक्ती जीवनात यशाच्या शिखराच्या दिशेने वाटचाल करताना आपण पहातो.

जगामध्ये जगमित्र । जीव्हेपाशी आहे सूत्र ॥ दा. १९.२.१९ ॥

लोकसंग्रहाचे केवढे महत्वाचे सूत्र समर्थ आपल्याला सांगतात. आपल्या बोलण्यातून आपण अनेक मित्र जोडत असतो तसेच अनेक शत्रू देखील निर्माण करत असतो. जगात जर जगमित्र व्हायचे असेल तर त्याचे वर्म आपल्या जिव्हेपाशी आहे. ' उत्तमपुरुष लक्षण ' याविषयी निरुपण करताना स्वत:वरुन दुसऱ्याचे अंत:करण कसे जाणावे याचे सोप्पे सूत्र सांगितले आहे.

कठीण शब्दे वाईट वाटते । हे तो प्रत्ययास येते ।

तरी मग वाईट बोलावे ते । काय निमित्ते ॥ दा. १२.१०.२३ ॥

माणसाने नेहमी स्वत:वरुन दुसऱ्याची परीक्षा करावी. दुसऱ्याच्या कटू बोलण्याने जसे आपले मन दुखावते तसेच आपल्या कठोर शब्दाने दुसऱ्याचे मन दुखावू शकते. दुसऱ्याचे मन दुखावणे ही एक प्रकारे हिंसाच आहे . अशी मानसिक हिंसा आपल्याकडून घडू नये यासाठी समर्थ आपल्याला सावध करतात.

आपणास चिमोटा घेतला । तेणे कासाविस जाला ।

आपणावरुन दुसऱ्याला । राखत जावे ॥ दा. १२.१०.२४ ॥

अव्दैताचे प्रत्यक्ष व्यवहारिक स्वरुप समर्थांनी या विचारातून शिकविले आहे.

जगामध्ये जगमित्र होण्यासाठी प्रथम एकमेकांविषयी वाटणारा राग, व्देष, मत्सर, या दुर्गुणांचा त्याग होणे गरजेचे आहे. स्वत:च्या विकासासाठी सुदृढ आरोग्यासाठी आणि मनाच्या प्रसन्नतेसाठी समर्थांनी षड्रिपुंवर विजय मिळवण्यास सांगितले आहे. क्रोध हा माणसाचा प्रधान शत्रू आहे हा क्रोध बळावतो कसा तर समर्थ म्हणतात,

अभिमानें उठे मत्सर | मत्सरें ये तिरस्कार |

पुढें क्रोधाचा विकार | प्रबळे बळें || दा. १.१.२३ ||

विचारशक्ती नष्ट करणारा, स्वत:बरोबर इतरांचा नाश करणाऱ्या क्रोधावर विजय मिळवण्याची शिकवण समर्थ देतात. भगवद्गीतेत भगवंतांनी स्पष्ट्पणे सांगितले आहे की, " क्रोधामुळे भ्रम होतो, विवेक सुटतो, भ्रमामुळे तसेच अविवेकामुळे विस्मरण होते, विस्मरणामुळे निश्चयात्मक बुद्धी नष्ट होते आणि बुद्धीनाश झाला , विवेकाचा नाश झाला की सर्वस्वाचा नाश होतो ( अ २. श्लो. ६३ ) स्वत: बरोबर इतरांचा नाश करणाऱ्या क्रोधाला मनातून हद्दपार करायला सांगुन समर्थ आपल्याला सावधच करतात. एखाद्या भुकंपाप्रमाणे आपल्या शरीराची व मनाची हानी करणाऱ्या क्रोधावर विजय मिळवून आनंदी जीवन जगण्याची कलाच समर्थ आपल्याला शिकवतात.

दंभ दर्प अभिमान | क्रोध आणि कठिण वचन |

हें आज्ञानाचें लक्षण | भगवद्गीतेंत बोलिलें || दा. १२.१०.२८ ||

क्रोधाबरोबरच दंभ, दर्प, अभिमान, कठोरवाणी यापासून कोसो दूर राहण्यास सांगतात. ही सर्व अज्ञानाची तसेच असुरी लक्षणे आहेत. समर्थांनां सर्वात जास्त चीड या नैतिक दुर्गुणांची आहे. समर्थ आपल्या महंतांना उत्तम महंत होण्यासाठी महंत व्हा पण महंती करु नका असे बजावतात. महंती म्हणजे महंतपणाचा डामडौल. हा डामडौल, खोटा दिमाख याचा समर्थांना तिटकारा आहे. विकारांवर विजय मिळवला तरच मन:शांती मिळणे शक्य आहे हे जाणुनच समर्थ आपल्याला वारंवार या दोषांपासून दूर राहण्याच आग्रह करतात.

अवगुण सोडितां जाती | उत्तम गुण अभासितां येती |

कुविद्या सांडून सिकती | शाहाणे विद्या || दा. १४. ६. ५ ||

हे दासबोधाचे प्रधान सूत्र आहे. स्वभावाला औषध नाही असे म्हणतात. परंतु प्रयत्नांच्या आधारे माणुस आपल्यामध्ये हवा तसा बदल घडवुन आणु शकतो हा विश्वास समर्थ आपल्या मनात जागा करतात. अचुक प्रयत्नांच्या आधारे मनावर संयम ठेवून, सातत्याने उत्तम गुण अभ्यासपूर्वक आपल्यात आणण्याचा प्रयत्न केला तर हे परिवर्तन सहज शक्य आहे हे समर्थ वरील ओवीत ठामपणे सांगतात.

समर्थांनी आपल्या कृतीतून, विचारांतून, प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. " यत्न तो देव जाणावा । यत्नेविण दरिद्रता " या बोधवाक्यातून समर्थ आपल्याला प्रयत्नांना देव मानण्याची शिकवण देतात. कोणत्याही गोष्टीत यश मिळविण्यासाठी " अचूक " प्रयत्न आणि कष्ट करण्याची तयारी महत्वाची आहे. हे जाणून समर्थांनी यत्नवादाचा पुरस्कार केला.

कष्टेंविण फळ नाहीं | कष्टेंविण राज्य नाहीं |

केल्याविण होत नाहीं | साध्य जनीं || दा. १८. ७. ३ ||

समर्थांच्या या उक्तीमधुन मनाच्या संकल्प शक्तीचा प्रत्यय येतो. अचुक प्रयत्न आणि जिद्द तसेच कष्ट केल्याने सुखाची प्राप्ती होते. पुरेशा प्रयत्नांच्या अभावाने अपयशाचे दु:ख पचवावे लागते. काही माणसे अशी असतात की त्यांना आपल्या प्रतिष्ठेला शोभेल असेच काम करायला आवडते. त्यामुळे आयुष्यात आलेल्या अनेक संधी त्यांना गमवाव्या लागतात.

आधीं कष्टाचें दुःख सोसिती | ते पुढें सुखाचें फळ भोगिती |

आधीं आळसें सुखावती | त्यास पुढें दुःख || द. १८. ७. ५ ||

मनुष्याने जर अचूक प्रयत्न केले तर त्यांच्या ऐहिक, पारलौकिक व पारमार्थिक सुखाच्या सर्व ईच्छा पूर्ण होतात. सातत्य, चिकाटी , दृढनिश्चय आणि ठाम विश्वास ही पुंजी जवळ असेल तर यशश्री आपल्यापासून नक्कीच लांब नाही. अचुक प्रयत्न, जिद्द तसेच कष्ट केल्याने सुखाची प्राप्ती होते. पण प्रयत्नांची कास न धरता केवळ दैवावर हवाला ठेवून आळशीपणा केला तर मात्र अपयश पदरात पडते. शत्रू हे केवळ बाहेरच्या कोणा व्यक्तीच्या रुपात असतात असे नाही तर ते आपल्या मनातही असतात. आळस हा आपला सर्वात मोठा शत्रू आहे. या दुर्गुणामुळे प्रयत्न करण्याची ईच्छाच होत नाही. एवढेच नाही तर वेळेचा देखील त्याला उपयोग करुन घेता येत नाही. आळस हा अवघ्या मानव जातीचा शत्रू आहे ज्याचा निषेध समर्थ करतात. आळस हे करंटेपणाचे लक्षण आहे. आपल्याला सर्वस्वी बुडविणाऱ्या आळसाचाच आळस करण्य़ाची शिकवण समर्थ देतात. कामचुकारपणा करायला लावणाऱ्या आळसाचा प्रयत्नपूर्वक त्याग करायला समर्थ सांगतात.

केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।

यत्न तो देव जाणावा। अंतरी धरीता बरे ॥

असे विचारधन देऊन समर्थांनी लोकांना प्रयत्नवादी बनविले. आपल्या प्रबोधनातून अंधश्रध्दा व आळस यांच्यावर त्यांनी घालाअ घातला आहे.

ऐक सदेवपणाचें लक्षण | रिकामा जाऊं नेदीयेक क्षण |

प्रपंचवेवसायाचें ज्ञान | बरें पाहे || दा. ११.३.२४ ||

समर्थांनी 'सिकवण निरुपण ' समासामध्ये सामान्य माणसाने आपले जीवन यशस्वी होण्यासाठी वेळेचे महत्व समजावून सांगितले आहे. आळसामध्ये आपल्या आयुष्याचा कोणताही क्षण वाया न जाऊ देणे हेच खरे भाग्याचे लक्षण असल्याचे समर्थांचे ठाम मत आहे. ज्याला आपल्या आयुष्यात काही करावयाचे

त्याने आपला वेळ सत्कार्णी लावावा असा आदर्श समर्थांनी या समासाव्दारे आपल्या समोर ठेवला आहे. " बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले " समर्थांनी स्वत: याच पध्द्तीने आपले आचरण ठेवले होते.

समर्थांनी आपल्या या ग्रंथामध्ये अनेक विषयांवर निरुपण करुन आपले जीवन आनंदी करण्यासाठी अनेक जीवनमूल्ये आपल्या समोर छोट्या छोट्या सूत्रांमधून व्यक्त केली आहेत. जगण्यावर भरभरुन प्रेम करायल शिकविणारा हा ग्रंथ सृष्टीचा मनापासून आस्वाद घ्या पण आसक्त होऊ नका हा संदेश देतो. कारण ही आसक्ती दु:खाचे मूळ कारण आहे. विवेकाच्या आधारे मन ताब्यात ठेवून जीवनमार्ग आक्रमण केला तर निश्चितच सुखी, आनंदी जीवन जगता येऊ शकते. विविध विषयांमागे धावणारे मन कसे स्थिर ठेवता येईल याचे मार्गदर्शन या ग्रंथात घडते.

सर्वसामान्य मनुष्य विषयलोलुप असतो. या भौतिक जगात जगताना सर्व सुखसोयी मिळाव्यात यासाठी झगडत असतो. या सुखांच्या मागे धावता धावता सुखाचा शोध कधीच संपुन जातो. केवळ धावणे आणि सुखसुविधा उपलब्ध करुन घेणॆ या गोंधळात सतत कष्ट करत राहुनही तो असंतुष्टच राहतो. सर्व सुखे त्याच्या दारात आली तरी वाढत्या गरजांमुळे फ़क्त असमाधानीच जीवन जगतो. सुखांच्या शोधात धावता धावता मन:शांती गमावून बसतो.

समर्थांनी १२ व्या दशकात सुखी, समाधानी जीवनाचे, मन:शांती प्राप्त करुन घेण्याचे अत्यंत सोपे सूत्र समजावून सांगितले आहे. समर्थांचा प्रपंच करण्याला विरोध नाही. उलट ते म्हणतात,

प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थ विवेक ।

जेणे करिता उभय लोक । संतुष्ट होती ॥

प्रपंचातील योग्य कर्म करुन परमार्थ साधण्याची कला समर्थ शिकवितात. हा प्रपंच नेटका करताना नकारात्मक विचारांना मनात स्थान न देता सकारत्मक विचारांवर भर देण्यास समर्थ सांगतात.

नेटका प्रपंच करत असताना परमार्थपण करणे गरजेचे आहे या समजुतीने आपण पूजापाठ, नामस्मरण, पोथीवाचन करित असतो. परंतु या कर्मा बरोबरच नकारात्मक कर्मे देखील तेव्हढीच किंबहूना जास्तच करत असतो. सकाळी पूजापाठ किंवा नामस्मरण करतो. दासबोधाचा समास वाचतो पण त्याच बरोबर दुसऱ्याची निंदा करणे, दुसऱ्याचे दोष काढणे, राग , तिरस्कार अशा कृतीपण आपल्याकडून तितक्याच सहजपणे घडत असतात. त्यामुळे आपण धड ना नेटका प्रपंच करत ना धड परमार्थ . या नकारात्मक विचारांचे उच्चाटण करुन सकारात्मक विचारांच्या सहाय्याने 'नेटके' आणि ' नेमके' आनंदी जीवन कसे जगता येईल हे उलगडून दाखविणारा श्रीमद दासबोध हा ग्रंथ आपल्याला आजही मार्गदर्शक ठरतो.

आज काळ बदलला, युगे बदलली, मनुष्याचे राहणीमान बदलले, विज्ञान प्रगत झाले परंतु माणसाची वृत्ती मात्र तशीच राहीली. त्यामुळे प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर पोहोचून देखील मनुष्य असमाधानीच राहीला. माझे ते माझे आणि तुझे तेही माझेच ही त्याची वृत्ती इतकी बळावली की हिंसाचार वाढला. गणेशस्तवनामध्ये बुद्धीची देवता असणाऱ्या गणेशाचे स्तवन समर्थ करतात. गणेशाच्या कृपेने आपल्याला अशी सूक्ष्म बुद्धी प्राप्त झाली म्हणून त्याच्यापुढे नतमस्तक होतात. आजच्या २१व्या शतकात मात्र मनुष्य आपल्याला प्राप्त झालेल्या या सामर्थ्याचा उपयोग दुसऱ्याच्या नाशासाठी करताना दिसतो. जगात घडणारे अतिरेकी हल्ले, बॉम्बस्फ़ोट या घटनातून या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. राग, व्देष, मत्सर, कोणत्या प्रकारची टोकाची हानी करु शकतात याचे आपल्याला प्रत्यंतर येते. विकारांच्या आधीन गेलेला मानव अत्यंत अस्वस्थ, अस्थिर, असमाधानी आयुष्य व्यतित करत आहे. प्रगतीच्या शिखराकडे वाट्चाल करणारा मानव विचारांनी मात्र अप्रगतच राहीला असे वाटते. विचारांची व्यापकता त्याच्यामध्ये नसल्यामुळे समर्थांच्या उपासनेचा व्यापक अर्थ त्याच्या मनापर्यंत पोहोचु शकत नाही. उपासनेचा गजर करणारे समर्थ " विश्वावर आपलेपणाने प्रेम करा " ही उपासना शिकवितात. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी अंतरात्मा आहे. म्हणून कोणाचेही अंत:करण न दुखावणे ही उपासना सांगतात.

आजच्या परिस्थितीत काही चांगले घडावयाचे असेल तर सकारात्मक विचारांना दिशा देणारे तसेच मन:शांती देणारे समर्थांचे वाड्मय नक्कीच

मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यांच्या ग्रंथातील समर्थ विचारानेच समाज सशक्त आणि समर्थ बनणार आहे. समर्थ आपल्यात राहूनच आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत. त्यासाठी सावधपणे, उघड्या डोळयांनी त्यांचा शोध घेतला पाहिजे, तरच त्याचा प्रत्यय येणार आहे.

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।

झाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ॥

जय जय रघुवीर समर्थ

Posted by Dr.Madhavi Mahajan

नमस्कार ,

http://wwwchintancom.blogspot.in/

या संकेतस्थळावर समर्थ रामदासस्वामी लिखित श्रीमद दासबोध या ग्रंथामधील निवडक ओव्या घेऊन त्यावरील चिंतन असे लिखाण करण्याचा मानस आहे. समर्थ रामदासस्वामी आणि त्याचे विचार आपल्याला सतत मार्गदर्शक ठरतात. परंतु अध्यात्मिक ग्रंथ वा त्यातील विचार याबद्दल पाहण्याचा दृष्टीकोण काहीसा संकुचित असल्यामुळे या ग्रंथाकडे , विचाराकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु जेव्हा यातील विचारांचे वाचन करून चितन मनन घडते तेव्हा ते विचार कृतीत उतरवणे किती गरजेचे आहे हे वाचकांच्या लक्षात येते.

आजच्या सामाजिक परिस्थितीबद्दल वेगळे लिहिण्याची गरज नाही . परंतु खूप कामात व्यस्त असणारे आपण इतरांना काय स्वत:ला देखील वेळ देऊ शकत नाही. घरात , घराबाहेर, ऑफीसमध्ये कुठेच आपल्याला स्वस्थता लाभत नाही. भरपूर पैसा, गाडी, बंगला, सर्व सुखसोयी असताना देखील मनाला शांतता वा समाधान लाभत नाही. अशा या मनाच्या अवस्थेमध्ये श्रीमद दासबोधासारखे ग्रंथ मनाला निश्चित दिशा देण्याचे काम करतात. मनावर संयम मिळविण्यासाठी कशाप्रकारचा विचार, वर्तन अपेक्षित आहे याविषयी हे ग्रंथ निश्चितच मार्गदर्शक ठरतात.

## दशक १ समास १ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[*] दशक व समासाच्या शीर्षकात येणारा ’नाम’हा शब्द वगळला आहे. प्रत्येक दशकासमोर व समासासमोर त्याचा अनुक्रमांक,पान.क्र. दिले आहेत.कठीण शब्दांसमोर समासक्रमांक व ओवीक्रमांक दिला आहे.[१] अभिप्राव १.३- अभिप्राय,[२] विदेहस्थिती१.६– देह असून नसल्यासारखी स्थिती,[३] मायोद्भव १.११- मायेची उत्त्पत्ती,[४] समती अन्वये १.१६- आधारानुसार, [५] मत्सरे १.१७- द्वेशाने, [६] प्रबळे १.२३- प्रबळ होतो, [७] बळे १.२३- बळामुळे,बळाने,सामर्थ्याने,[८] नासला १.२४- बिघडला ,[९] अंतरी १.२४- मनामध्ये,[१०] अहंभावे १.२४- अहंकाराने, [११] लिथाडला १.२५- बरबटला, [१२] मागां १.२७- या आधी,[१३] श्रोतीं १.२७- श्रोत्यांनी, [१४] आक्षेपिलें १.२७- विचारले, [१५] जी ये ग्रंथी १.२७- या ग्रंथामध्ये, [१६] सकळही १.२७- सर्वकाही [१७] संकळीत १.२७- सर्व एकत्र करुन सारांश रुपाने, थोडक्यात, [१८] येकसरां १.२८- एकूणसारे, सारांशाने,[१९] भ्रांत १.३२- गैरसमजूती असलेले लोक, [२०] अवगुणी १.३२ -दुर्गुणी, [२१] अवलक्षण १.३२ -वाईट लक्षणांचे, [२२] सुलक्षण १.३२- चांगली लक्षणं, [२३] तार्किक१.३२- तर्क चालवून सूक्ष्म विचार करणारे, [२४] विचक्षण १.३२- चतुर, हुशार,

दशक १ समास २ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] टेव २.८- ऐट,रुबाब ([*] छापील प्रतीत’ठेव’असा पाठ आहे.) [२] निर्भर उद्दित २.९- अतिशय उल्हसित [३] थबथबा२.११- थबथबलेली, गच्च भरुन वाहणारी [४] षट्पदकुळे २.११- संतसमूह (षट्पद=भुंगे,) [५] झुंकार शब्दे २.११- घोंगावत, [६] मुर्डिव शुंडादंड २.१२- मुरडलेली सोटायुक्त सोंड, [७] लंबित २.१२- लोंबणारा, [८] अधर २.१२- खालचा ओठ, [९] तिक्षण २.१२- उग्र गंध, [१०] आवाळे २.१२- गंडस्थळ [११] मंदसत्वी २.१२- मंदपणे, हळुहळू,थोडाथोडा, [१२] हरस्व लोचन २.१३- बारीक डोळे, [१३] हिलावी २.१३- उघडझाप करतो, [१४] लवलवित २.१३- लवचिक, [१५] कर्णथापा २.१३- कानाच्या पाळया,  [१६] चौदाविद्या २.१३- ४वेदविद्या, ६वेदांगशास्त्रे, ४न्याय, मिमांसा, पुराणे, धर्मशास्त्र [१७] रत्नखचित २.१४- रत्नजडित, [१८] मुगुटी २.१४- मुकुटा मध्ये, [१९] झळाळ २.१४- चमकतात [२०] सुरंग २.१४- मनमोहक रंगीत, [२१] कीळ २.१४- नेत्रसुखद, झगमगाट, नयनमनोहर प्रकाश [२२] नीळ २.१४- निळसर प्रकाश, [२३] झमकती २.१४- चमचम करतात, [२४] सद्दट २.१५- घट्ट, [२५] हेमकट्ट २.१५- सुवर्णकडे, [२६] तळवटी २.१५- तळाला, [२७] लवथवित २.१६- थुलथुलीत, [२८] मलपे

दशक १ समास ३ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[*] शास्त्रेपुराणें ३.१९-

पूर्वमीमांसा,उत्तरमीमांसा,न्याय,सांख्य, वैशेषिक व योग ही ६शास्त्रे आणि १८पुराणे- मस्य,मार्कंडेय,भविष्य,भागवत, ब्रह्मांड,

गरुड,लिंग,पद्म,वामन,अग्नि,सूर्य,नारद,वाराह,ब्रह्म,वैवर्त,विष्णु, ब्रह्म,शिव.[१] ब्रह्मसुता३.१- ब्रह्माची कन्या,[२] शब्दमूळ ३.१- नादमूळ/ जननी [३]वाग्देवता ३.१- वाणीची देवता, [४]शब्दांकुर३.२- सूक्ष्मनाद, [५] वैखरी ३.२- प्रकटवाणी,[६]अभ्यांतर ३.२- अंतरंग, [७] धारिष्टांची कृतबुद्धी ३.३- धाडसी व्यक्तिंची निश्चयात्मक/करारी बुद्धी, निर्भयता, [८] विद्या ३.३- ज्ञान [९] अविद्या ३.३- अज्ञान, [१०] उपाधी ३.३-उद्योग, पसारा,खटाटोप,[११] माहा पुरुष ३.४- आदिपुरुष, [१२] सलग्न ३.४-जवळ, [१३] तुर्या ३.४- मनाची एक अवस्था, [१४] जयेकरिता ३.४- जिच्यामुळे,[१५] महत्कार्या- महानकार्यासाठी, [१६] प्रवर्तले ३.४- सिद्ध झाले,[१७] नैराशशोभा ३.५- उदासीनवृत्तीयुक्त सौंदर्यशोभा वाढवते, [१८] घडी ३.६- निर्माण करते,घडवते, [१९] लीळाविनोदेचि ३.६- गंमतीने खेळ करते,[२०] मोडी३.६- मोडून टाकते,विस्कटते, [२१]दडी ३.६- लपते, [२२] आडळे ३.७- आढळते, [२३] नाडळे

३.१६- इतकेच नव्हे तर, [५२] व्यापकपणे ३.१८- सर्वांना व्यापून राहिलेली, [५३] सर्वांघटी ३.१८- सर्व घटकांमध्ये [५४] ज्ञेप्ती मात्रे ३.२१- केवळ ज्ञानमय शुद्ध जाणीवेने,संवेदनेने, ज्ञान स्वरुपाने [५५] नकळे ३.२३- कळत नाही, [५६] नाटक लाघवी३.२३- मनमोहक अभिनयाने रचलेले,[५७]थोराथोरासी३.२३-मोठ्या ज्ञानी समजणाऱ्यांना [५८] गोवी ३.२३- गुंतवते, [५९]जाणपणे ३.२३- ज्ञाना भिमानामुळे, [६०] ठाव ३.२५- आधार,मदत,[६१] तयेसी ३.२६-(येथे) त्या शारदेला, [६२] तदांशेचि३.२६-(शारदा हिच माया,त्याशारदेच्या) अंशरुपाने तादात्म्यपावून,

दशक १ समास ४ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] वर्णवेना ४.१- वर्णन करता येत नाही, [२] नेति नेति ४.२- असे नाही,असे नाही,[३] श्रुति ४.२- वेद,[४] मज मूर्खाची-आपल्यासारख्या अज्ञानी व्यक्तिची, [५] पवाडेल ४.२- आकलन करेल. [६] दुराशा ४.४- अशक्य अपेक्षा, [७] भर्वसा ४.४- भरंवसा, [८] वांछित ४.५- इच्छा, [९]जाली लज्यायमान ४.५- लाजून बसली,[१०] नातुडे ४.६- आकलन होत नाही,[११] प्रतिमा ४.६- मूर्ति, [१२] भावासारिखा मनीं ४.७- मनात जसा भाव असेल तसा,[१३] स्तऊं ४.७- वंदन करुया,[१४] तुझियेन ४.९- तुझ्यामुळे, [१५] अभयंकरे ४.९- अभयहस्तामुळे, [१६] वोसरे ४.९-ओसरतो,[१७] नीसी ४.१०- रात्र,[१८] वाव ४.११- अंतर,दूर करतो,मुक्त करतो, [१९] लोहो ४.१२- लोखंड,[२०]सर्वथा ४.१२- कधीच, थोडेसेही, [२१]गुरुदास ४.१२- शिष्य,सेवक,[२२]संदेही ४.१२- संशयात, [२३] पडोंचि नेणे ४.१२- पडत नाही, [२४] मिळणी ४.१३- संगम, [२५] वाहाळ ४.१४- ओढा,नाला [२६] वेगे ४.१४- लगेच,[२७] गुरुत्व ४.१६- गुरुरुप,[२८] न साहे ४.१६- सहन करत नाही, [२९] क्षार ४.१७- खारट, [३०] क्षीरसागर ४.१७- दुधाचा समुद्र, [३१] कल्पांती ४.१७- कल्पाचा अंत होताच,[३२] गगनापरीस४.१९-

आकाशापेक्षा/हून, [३३] ते ४.१९-सद्‌गुरु, [३४] हीन ४.२०- उणावणारा, [३५] धीरपणे ४.२०- धीराने वागणारा (सद्‌गुरु),[३६] जगती ४.२०- जगामध्ये, अवनीवर, [३७] खचेल ४.२०- नाश पावेल, [३८] धीरत्वास ४.२०- सद्‌गुरूस, [३९] गभस्ती ४.२१- सूर्य,[४०] फणीवर ४.२२- शेषनाग, [४१]कल्पतरु ४.२५- कल्पवृक्ष, [४२] अंगिकारु ४.२५- स्वीकार [४३] दुभणी ४.२६- धार काढणे, [४४] निःकाम ४.२६- निरिच्छ,[४५] न लगती ४.२६- लागत नाहीत, [४६] सर्वदा ४.२९- नेहमी,[४७] आघवी ४.३०- सगळी,[४८] उठाठेवी ४.३०- उपद्‌व्याप, [४९] हे गे हेचि ४.३१- ही जी आहे तीच. येथे ’गे’ हा शब्द पादपूरणार्थ असून“सद्‌गुरुचे वर्णन होत नाही हेच सद्‌गुरुचे वर्णन होय“ असा याचा अर्थ होतो. [५०] अंतरस्थितीचिया४.३१-आतल्या अवस्थेच्या, [५१] अंतर्निष्ठ ४.३१- अंतःकरणात निष्ठा असलेले,

पदरचनाकरतात,(स.भ.शंकर देव येथे 'पदप्रास' शब्द असावा असं सांगतात)[१०] नवरस ७.२८- नवरस व त्याचे स्थायीभाव याप्रमाणें १) शृंगार- रति,२) हास्य- आनंद, ३)करुण- शोक,४)रौद्र-क्रोध, ५)वीर- उत्साह,६) भयानक- भय,७) बीभत्स- घृणा, ८) अद्भूत-विस्मय, ९)शांत-शम. इ.रसात कवि आपलं लेखन करीत असत. बहुतेक सर्व शास्त्रसिद्धांताचे लेखन गेयसुलभ काव्यरुपात होत असे.अनेक विद्वानांचे हे काव्य मुखोद्गत असे. [११] आदिशक्तीचे ठेवणे ७.३०- आदिमायेची खास निर्मिती (हे कवी)[१२] तारुवे ७.३१- तारवे, [१३] आक्षै ७.३१- अक्षय, [१४] उतटली ७.३१- काठोकाठ भरुन वाहणारी, [१५] ईश्वराचा पवाड ७.३३- ईश्वाराची दिव्य कीर्ति / गुणकर्मे, / मोठेपणा [१६] गगना हूनवाड ७.३३- गगनाहून विशाल. [१७] जाड ७.३३- अतिविशाल ,भव्य.

टिप :-मुमुक्ष साधकांनी दासबोधाचे वाचन करीत असतां प.पू.परम हंस परिवाजकाचार्य श्री हंसराज स्वामीकृत “श्रीमत् दासबोधाची संकेत कुबडी “ या ग्रंथाचेही अवश्य वाचन,मनन,चिंतन करावे.त्यामुळें दासबोधाचे आकलन होण्यास चांगली मदत होईल.स.भ.पु.ज्ञा.कुलकर्णी. .

दशक १ समास ८ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] तिष्ठतु ८.१- वाट पहात [२] भरें ८.१- आनंदाच्या भरानें [३] घडघडाट ८.३- गडगडाट [४] मथन ८.५- मंथन,चर्चा [५] सुचिस्मंत८.८- शुद्ध,पवित्र,शुचिर्भूत, [६] उदास ८.९- भोगाबाबत उदासीन, [७] वीतरागी ८.९- विरक्त, [८] नेमक ८.९- नियमाने वागणारा[९] बहुवस ८.९- बहुधा, [१०] मनस्वी ८.११- मनावर ताबा ठेवणारे [११] जनस्वी८.११-लोकांच्या कलाने वागून लोकांवर नियंत्रण ठेवणारे [१२] विमळकर्ते ८.१३-निर्मळ, संशय निरसन करणारे, [१३] दिग्वल्की ८.१४- दिगंबर, [१४] माहाभले ८.१७- अतिशय चांगले, उत्तम [१५] माहाश्रोत्री ८.१७-वेदांचे ज्ञानी, [१६] सत्वधीर ८.२२-धैर्यशील, [१७] नव्हाळी ८.२२- नूतन,[१८] तमाळनीळ ८.२५- श्रीराम,यमधर्म [१९] बाणे१.२६- लाभते, [२०] कल्लौ १.२९- कलियुगात [२१] मावळती १.२९- मिटतात.

## दशक २ समास १ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] परिसोत १.५- ऐकावेत,[२] सखी मानिली अंतुरी १.८– बायकोसच केवळ जवळची समजून [३] परन्यून बोले रात्रीं १.१४- एकांतात दुसऱ्याची उणीदुणी काढणे.(रात्री=अंधारीजागा) [४] परिच्छिन्न १.१६- उघड [५] सप्त वेसनी १.१६- जारण,मारण, विध्वंसन, वशीकरण, स्तंभन, मोहन व उच्चाटन ही ७ व्यसने (जुगार,वेश्या,चोरी,चहाडी, परस्त्री,पशुपक्षी-झुंज,तमाशा अशीहि सात व्यसनं होत ) [६] परावी आस- १.१७ दुसऱ्याची आशा [७] निसुगाई १.१७- आळशीपणा, [८] निर्बुजे १.१८- गांगरुन जाणे,[९] आरजास १.२०- सभ्य इसमास [१०] सैरावर्ते १.२१- बेलगाम वर्तन करतो,[११] सर्वकाळ जो दुश्चित १.२५- संसाराविषयी सतत चिंताग्रस्त, [१२]स्वल्पासाठी १.२६-थोड्यासाठी, [१३] कृपण १.२६- कंजुष [१४] देवलंड पितृलंड १.२७- देवाविषयी, वडिलांविषयी मनात भिती असूनही [त्यांची मानमर्यादा न राखता] , [१५] शक्तिवीण करी तोंड १.२७- आपली कुवत नओळखता,अमर्याद पणे वाचाळपणा करतो,[१६] भंडउभंड १.२७-अश्लील बडबड, [१७] नीच याती १.२९- नीचवृत्तीचे लोक [१८] सांगात १.२९- संगत [१९] मार्गे जाय खात खात १.२९- (उभ्याने)रस्त्याने खात जाणारा [२०] तपीळ १.३१- तापट [२१] कुश्चिळ १.३१- दुर्वर्तनी, [२२] कुटीळ

१.३१- कपटी [२३] निचाड १.३३- निर्लज्ज [२४] लंडी १.३३- उद्धट, [२५] लाबाड १.३३- लबाड, [२६] चौबारा १.३४- चव्हाट्यावर [२७] घ्राण १.३५- नासिका, [२८] पाणी १.३५- हात, [२९]वसन १.३५- कपडे [३०] चरण १.३५- पाय, [३१] वैधृति आणि वितिपात १.३६- वैधृति आणी व्यतिपात हे वाईट मुहूर्त,[३२]कळत्र १.४०- कुटुंब, [३३]अष्टगुणे१.४२- आठपट, [३४] तुकतोडून १.४७- सरळ अनुमान सोडून, मर्यादा सोडून [३५] पत्य १.४८- पत,महत्व[३६] खिजे १.४८– चिडतो[३७] होड १.४९- पैज, [३८]काजेंविण१.४९-कामकाजाशिवाय, विनाकारण, [३९] बोलोचि १.४९- बोलणं जरुर असते त्यावेळी, [४०] मुखजड १.४९-अबोल,[४१] गोत्रजास १.५०- गोतावळयावर, [४२]सरोत्तरी १.५२- बरोबरीने प्रत्युत्तर देतो, [४३] वामहस्ते १.५२- डाव्या हाताने, [४४]समर्थासी मत्सर धरी १.५३- (आर्थिक वा शारिरीक) बलवानाचा द्वेश करतो [४५] सार्थके विण १.५४-हिताशिवाय किंवा सार्थक न करता, [४६]वेची१.५४- वाया दवडतो, [४७] वयसा १.५४- आयुष्याची वर्षे, [४८] देवासगाळी १.५५- देवास दोष देणे, [४९] मैत्राचे उणे १.५५- मित्राचे दोष,[५०] धारकी धरी १.५६-धारेवर धरणे, [५१] समर्थांच्या मनीचे तुटे १.५७- वडिल धाऱ्यांच्या मनातून उतरलेला, [५२]क्षणा बरा क्षणा पालटे १.५७- क्षणाक्षणाला वर्तन बदलणारा,

चंचळ वृत्तीचा, [५३] संगतीचे मनुष्य तोडी १.५९- बरोबरीचे लोकांना दूर लोटणारा, [५४] बहुतांचे उचिष्ट अंगिकारी १.५९- अनेकांचे उष्टे खाणारा,[५५]अभिळासी १.६१- हावरट, [५६] पर्वत १.६१-देवघेव करणारा, [५७] अतिताचा अंत पाहे १.६२- पाहुण्यास मदत करण्यास कचरणारा, [५८]गुरळी १.६४-चूळ टाकणे, [५९] पाये पाये कांडोळी १.६४- पायाने पाय खाजवणे, [६०] मर्यादे विण पाळी सुणे १.६५-शिस्तीशिवाय कुत्रे पाळतो, [६१] मुकिवस्तु १.६६- मुके प्राणी, [६२] निघाते १.६६- निर्दयपणे,शस्त्राने,[६३] तोडविना १.६७- सोडवण्या ऐवजी,[६४] खोटेसाहे १.६७- खोटे सहन करणारा,[६५] पुढीलाचे १.६९- इतरांचे,[६६]*आपण वाचीना कधी १.७१- आपण स्वतः कधी वाचत नाही (ही ओवी श्रीसमर्थांनी मागाहून शोध देतांना स्वहस्ते घातली:इति स.भ.शंकर देव)[६७] चीत्त देउनीया१.७२-मन लाऊन[६८]येथामती१.७३-बुद्धिच्या कुवतीनुसार

परस्त्रीशी संबंध [२२] मागे उणे २.३०- एखाद्याचे माघारी त्याचे दोष दाखवणे, [२३] समईं यावा चुको नये २.३१- प्रसंग पडेल तेव्हा मदत करण्यास चुकू नये. [२४] मर्यादेविण चालो नये २.३२- [सज्जनांच्या संगतीत] मर्यादा सोडून वागू नये,[२५] दुश्चितपणे विसरो नये २.३३- निष्काळजीपणे विसरू नये [२६] चुकुरपणे २.३४- चुकारपणाने, [२७] भलते भरी भरो नये २.३६- भलते काम करण्याच्या भरीस पडू नये, [२८] पाऊस देखोन जाऊ नये अथवा अवकाळी २.३७- फार पाऊस पडत असता किंवा अवेळी प्रवासास जाऊ नये, [२९] जिणे शाश्वत मानो नये वैभवेसी २.३९- ऐश्वर्ययुक्त जीवनाचा भरोसा धरु नये. [३०] विवेके दृढ धरावी २.४१- विवेकपूर्वक घट्ट पकडावी,

सुवर्ण कण :- प्रपंच आणि संसार यात श्रीसमर्थांनी पुष्कळवेळा भेद मानला आहे. हा भेद विचारांत न घेता, श्रीसमर्थरामदासानी प्रपंचाची जी तरफदारी केली आहे तिचा उपयोग संसारी लोक स्वतःच्या वर्तनाचे समर्थन करण्यासाठी करत असतात. संसारी लोकांनी हा भेद समजून घ्यावा, आणि प्रपंच नेटका करावा. जीवनाचे सार्थक करावे- इति स. भ. शंकर श्रीकृष्ण देव.॥ श्रीराम ॥

व्यसनी, [१३] निसंगळ ३.१८- बंधनहीन, मोकाट, निर्लज्ज [१४] खळ ३.१८- दुष्ट, [१५] वोखटे ३.१९- वाईट, [१६] धिःकारी ३.१९- तिरस्कार/धिःकार करणारा, [१७] वादक ३.२०- वाद घालणारा, [१८] भेदक ३.२०- कपटी, [१९] त्रासक ३.२०- त्रासदायक, [२०] दीनरुप ३.२०- भिकारी,[२१] न्यूनवचनी ३.२२- व्यंगावर बोलणारा, [२२] पैशुन्यवचनी ३.२२- घातकी बोलणारा, [२३] आनित्यवचनी ३.२२- क्षणोक्षणी बोलणं बदलणारा, [२४] अनृत्यवचनी ३.२२- खोटारडा, [२५] कुटिळ ३.२३- कुटील [२६] गाठ्याळ,नट्याळ ३.२३- आतल्या गाठीचा, द्वाड [२७] कुर्टे ३.२३- क्षुद्र वृत्तीचा, [२८] कुचर ३.२३- अंगचोर,कठोर,[२९] नट्याळ ३.२३- खोडसाळ, [३०] कुधन ३.२३- वाममार्गी मिळकत, [३१] आत्महत्यारा ३.२५- आत्मघातकी,[३२] स्त्रीहत्यारा ३.२५- स्त्रीघातकी, [३३] गोहत्यारा ३.२५- कसाई,गायघातकी,[३४] ब्रह्महत्यारा ३.२५- ब्रह्मघातकी, [३५] माहापापी३.२५- महापातकी [३६] पतित ३.२५- भ्रष्ट [३७] कुपात्र ३.२५- अयोग्य [३८] कुतर्की ३.२६- वाईटतर्क करणारा [३९] तल्पकी ३.२६- परस्त्रीरत, [४०] नारकी ३.२६- नरकात जाण्यायोग्य, [४१] अतित्याइ ३.२६- आततायी, [४२] जल्पक ३.२६- निंदक,बडबड्या, [४३] किंत ३.२७- संशयी,[४४] कळहो ३.२७- कलहप्रिय,[४५] अनरहाटी ३.२७- जनरीत

मोडणारा,[४६] शोकसंग्रहो ३.२७- शोकग्रस्त, शोकाकूल, [४७] विग्रहो ३.२७- भेद निर्माता,[४८] निग्रह कर्ता ३.२७- हट्टी.[४९] आपेसी ३.२८- अपयशी,[५०] लच्याळ३.२८– लोचट ,[५१] आद्दत्त ३.२८- घट्ट मुठीचा,कृपण,[५२] झोड ३.२८- शिरजोर,कोडगा [५३] आदखणा ३.२८- परहित न आवडणारा, [५४] शठ ३.२९- लबाड,[५५] शुंभ कातरु ३.२९- मठ्ठ व भित्रा, [५६] लंड, तर्मुंड, सिंतरु ३.२९- बेपर्वा, लुडबुड्या, लफंगा, [५७] बंड, पाषांड ३.२९-उन्मत्त ,पाखंडी,[५८] सैराट ३.३०- स्वैर, [५९] थोट,बटवाल ३.३०- कुभांडी व बाटगा, [६०] वरपेकरी३.३१- लुटारु, [६१] खाणॊरी ३.३१- घरात खणून धन शोधणारा, [६२] मैंद ३.३१- घातकी, [६३] भुररेकरी ३.३१-भुरळपाडून लबाडी करणारा, [६४] कळभंट ३.३२-

कळलाव्या,[६५]टोणपा/धट ३.३२- धटिंगण,[६६] लौंद,ठस, ठोंबस ३.३२-

पुष्ठ,चिवट,अशिक्षित[६७]खट,जगभांड,विकारी ३.३२- खट्याळ, भांडकुदळ, विकारवश, [६८] आळिका ३.३३- आळघेणारा, हावरा, [६९] बधीर ३.३३- बहिरा, [७०] अदृष्टहीन ३.३४-भाग्यहीन, [७१] विपारा ३.३५- विद्रुप

दशक २ समास ५ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] सबळ ५.३-शबल,बाधक,संमिश्र,मायिक [२] दुहिता ५.९-कन्या, [३] बरे खावें बरे जेवावे ५.१०- खायलाप्यायला उत्तम मिळावे अशी इच्छा हा रजोगुण.[४] मी तरुण मी सुंदर ५.१४-'मी तरूणा' असा पाठ छापील प्रतीत आहे.पण 'तरूण' असा पाठ योग्य वाटतो, [५] हिंपुटी५.२२- दुःख, [६] ढवाळी ५.२५-थट्टा [७] वेवादा ५.२५-वाद, [८] नटावलोकी ५.२७-नाटक शौकीन, [९] ग्रामज्य ५.२८- मैथुन,गाव भानगडी,[१०] तश्करविद्या ५.२९-चोरीची विद्या, [११] आळकेपण ५.३१- आवड, [१२] गोडग्रासी ५.३१-गोडघासी, [१३] उपोषण केले नवचे ५.३१- उपवास सहन होत नाही,नवचे हा शब्द श्रीसमर्थांनी अनेक अर्थांनी वापरला आहे. [१४] कळा लाघवी पवाडे ५.३२- कला कौशल्यात मन रमते.[१५] तो सबळ जाण दारुण दुःख भोगवी ५.३४- प्रपंचात (तो) हा शबल रजोगुण कसे दुःख देतो ते जाणून घ्यावे [१६] माव ५.३९- माया.[१७]रजोगुण परिपूर्ण भजनमूळ ५.४१-“प्रवृत्ती निर्मिती” हे रजोगुणाचे कार्य असते. सत्वगुणा मागे हा रजोगुण उभा राहिला तर तो रजोगुण अशा सज्जनास ईश्वर भजनाकडे वळवतो. [१८] परिसिला ५.४२- सांगितला आहे.

कारण | मोक्षप्राप्तीचें लक्षण | नव्हे येणें ||३९||

केल्या कर्माचें फळ | प्राप्त होईल सकळ |

जन्म दुःखाचें मूळ | तुटेना कीं ||४०||

व्हावया जन्माचें खंडण | पाहिजे तो सत्वगुण |

तेंचि असे निरुपण | पुढिले समासीं ||४१||

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

*तमोगुणलक्षणनाम समास सहावा || २.६ ||

दशक २ समास ६ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[*]तमोगुणलक्षण २.६- छापील प्रतीत ’तमोगुण’असे आहे.

[१] काविरे ६.५-वारे, [२] अखंड भ्रांती पडे ६.८- सतत संभ्रमात असणे. पाच प्रकारचे भ्रम असतात.१) जगत्सत्यत्वभ्रांती- नामरुपानी भरलेले जग सत्य वाटून ब्रह्माचा विसर पडतो. जगच खरे आहे असा भ्रम होतो. २) कर्तृत्वभोक्तृत्वभ्रांती- निष्क्रिय आत्म्याच्या सत्तेवर बुद्धीचे व्यवहार चालतात त्यामुळे तो आत्माच कर्ता आहे असा भ्रम होतो. जास्वंदी-स्फटिक दृष्टांत.३) भेदभ्रांती- आत्मबिंबाचे आभासरुप प्रतिबिंब स्वच्छ बुद्धीत पडल्याने आत्मा व जीव असा भेदभ्रम होतो. प्रतिबिंबवाद.४) संगभ्रांती-

दशक २ समास ७ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[*]सत्वगुणलक्षण २.७- छापील प्रतीत 'सत्वगुण'असे आहे.

[१] कोंवसा ७.४- आधार, [२] भवार्णव ७.४- भवसागर, [३] मंडण ७.५-सौंदर्य, [४] निर्शन ७.५- निरसन [५] येजन,याजन ७.१३- यज्ञ करणे, यज्ञ करवणे [६] आधेन ७.१३- अध्ययन [७] ब्राह्मणसंतर्पण ७.१६-संतसज्जनास दान, [८] अग्रारे ७.१९- अग्रहार [गरीबांना जमीनदान करणे] [९] पाईरीया ७.२०- पायऱ्या [१०] भुयेरी ७.२२ - भुयारे, [११] जेंगट ७.२४- झेंगट [वाद्य], [१२] दमामे- मोठे नगारे, [१३] काहळ- मोठे ढोल, [१४] छेत्रे ७.२६- छत्र,निवारा, [१५] चामरे ७.२६- चवऱ्या, [१६] सूर्यापाने ७.२६- अब्दागिऱ्या,[१७] माळा व धुशर ७.३२- माळा व बुक्का, [१८] तिष्ठत उभी ७.३५- वाट पहात उभी असतात. [१९] निडारले ७.३९- भरुन आले,पाणावले [२०] तडितापडी ७.५४- साधुसंत [२१] वोसावला ७.६०- व्याकुळ झाला, [२२] नैराश्यता विलसे ७.६२-निर्वासनता प्रगटपणे दिसते, [२३] समुद्रा ऐसी सांठवण ७.६६- (दुसऱ्याचे गुणदोष जाणून) पोटात घालणे हा सत्वगुण [२४]विदेसी ७.७४- परदेशी, [२५] झळफळीत ७.८२- चकचकीत,[२६] गवाळी ७.८२- गोमुख, [२७] हरिख ७.८३- आनंद.

दशक २ समास ८ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] वक्ता आणि नैराशता८.६- वक्ता असून निर्लोभी/विरक्त

[२] युक्ताहारी ८.८- माफक भोजन घेणारा, [३] पद्महस्ती ८.८- हातावर कमलचिन्ह असलेला यशस्वी मनुष्य [असे चिन्ह यशदर्शक व शुभ समजतात ], [४] तत्त्वज्ञ आणि उदासीन ८.१०– तत्त्वज्ञानी असून अनासक्त असलेला, [५] आगम निगम शोधक ८.१५- वेदवेदांताचा सूक्ष्म अभ्यासक, [६] ज्ञानविज्ञानबोधक ८.१५- वास्तव चैतन्य ब्रह्माविषयीचे ज्ञान [अविद्या] व आत्मस्वरुपाविषयीचे ज्ञान [विज्ञान] याची बोधानुभूती घेतलेला, [७] कायाक्लेसी ८.१६- व्रतवैकल्यासाठी कायाक्लेश घेणारा, [८] सुगड८.१९- चतुरपणाने केलेले काम, [९] द्रव्यसूची दारासूची ८.२०- पैसा व स्त्री याबाबत पवित्र वर्तन असणारा, [१०] न्यायसूची ८.२०- नीतिमान, [११] अंतरसूची ८.२०- निर्मळ मनाचा,[१२] सर्वसूची ८.२०- संपूर्ण जीवनच अंतर्बाह्य निर्मळ असलेला, [१३] वेत्रधारी ८.२१- संरक्षक, [१४] सकळ क्लृप्त ८.२२- सगळं काही जाणणारा,कुठल्याही शंकांचे समाधान करणारा [१५] शब्दार्था जाऊच नेदी ८.२२- शब्दार्थाकडे बारीक लक्ष ठेवून, [१६] लक्ष्णवंत ८.२८- ऐश्वर्यसंपन्न,[१७] परी ८.३२- परंतु

दशक २ समास १० मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] वाखाणी १०.७- स्तुती,कौतुक, [२] जाणपणे भरी भरे १०.१०- ज्ञानी समजून घमेंडीने फुगणे, [३] निवऊं १०.१४- समाधान, शांत करणे, [४] नेणे १०.१४- जाणत नाही, [५] हस्त १०.१५- हत्ती, [६] ऊर्णतंते १०.१५- कोळीष्टकाच्या तंतूने, [७] भरोन वैभवाचे भरी १०.२०- ऐश्वर्याच्या घमेंडीत, [८] थांवरी १०.२०- सांभाळी [९] सवेचि १०.२५- लगेच, [१०] जाणपणे घे अंधार १०.२७- जाणूनबुजून अविद्येच्या/ अज्ञानाच्या अंधारात राहणारा, (अंधार या ऐवजी 'अ/आधार' असा पाठ इतर प्रतीत आहे.) [११] सोंग संपाधी वरीवरी १०.२९-समजून वरवरचे चांगले वागण्याचे सोंग घेणे/संपादणे. [१२] उपंढर १०.३७ अस्ताव्यस्त, अव्यवस्था. [१३] आपणामध्ये उपंढर पडे१०.३७- आपले स्वतःचे जीवन विस्कळीत होते, [१४] द्वेषी देवाब्राह्मणांचा १०.३८- संतसज्जनांचा मत्सर करणारा, [१५] विचक्षणे नीउन पूर्ण क्ष्मा केले पाहिजे१०.३९- विचारवंतानी त्यातील न्यून पूर्ण करून क्षमा करावी. [१६] विचक्षण १०.३९- चतुर, विचारवंत [१७] नीउन १०.३९- न्यून, उणेपण,कमरता,

## दशक ३ समास १ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] कर्माची आटणी १.२- कर्माची मूस [२] निच नवी १.२- नित्य नूतन, [३] जन्म भ्रांतीचे पडळ १.३- जन्म भ्रमाचा पडदा, [४] गथागोवी १.४- गुंतावळ,गुरफटणे, [५] लांवेचा वळसा १.६- डाकीणीचे झपाटणे,[६] मायेचे मैंदावे १.७- मायचे कपट/लबाडी [७] क्रोधाचे विरावे १.७- रागक्रोध याचे वीरपण,[८] विषय १.९-“विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च”-ज्याच्या ठिकाणी इंद्रिये आणि मन बुडून जातात, मग्न होतात असे पदार्थ म्हणजेच इंद्रियभोग होत, [९] वोखटी वेळ १.१०- वाईट वेळ, [१०] प्रत्यई धुईजेते १.१५- दररोज धुतले तरी. [११] अशुद्ध शब्दे शुद्ध नाही १.१७- अशुद्ध म्हणजे जे शुद्ध नाही असे ते रक्त [१२] बळसे वाहे घ्राण १.२०- नाकातून शेंबूड वाहतो.[१३] त्वचेविण गर्भ खोळे १.३१- अपूर्ण वाढलेला गर्भ हालचाल(खोळे) करतो. [१४] कटव-तिक्षणे १.३१- कडू व तीक्ष्ण रसामुळें [१५] वंकनाळे १.३२- वक्रवार व नाळ, [१६] मातेने सांडिले कळिवर १.४२- आईने देह सोडून दिला,

मेसको मायराणी २.२७- जलदेवता,[११] ब्रह्मगिरो २.२८- ब्रह्मसंमध,[१२]चेडा वोलांडला २.२८- मंतरलेली वस्तु ओलांडली, [१३] संभ्रमे मांडीला विव्हाव २.३५- संसारलोभात गुंतून विवाह केला, [१४] कळांतरे २.३७ व्याजाने (कळा/कला म्हणजे व्याज)[१५] आंतर्भाव २.३८- मनातून,[१६] होताती सर्वस्वे कुडकुडी २.३८- ते सगळीकडून नाडले जातात,[१७] अत्यंत लोधला २.४०- अतिशय भुलून गेला,[१८] पापिणी अविद्येने २.४०- पापी अविद्ये मुळे [अज्ञानामुळे,] [१९] प्रीती वाढविती कामा २.४१-प्रेमामुळे काम-वासना वाढते,[२०] ग्रामज्याचे मैंदावें २.४३- ग्राम्य वृत्तीने भुलवणे [२१]अनेत्र वेवसाई क्रमेना २.४४- अन्यत्र व्यवसायात करमेना, [मन लागेना],[२२]मैंद २.४७- लबाड,भुरळ [२३] कोणी रागेजली २.४८- कोणी रागावले तर, [२४] स्त्रीकारणे सांडवला विवेकासी २.५१- स्त्रीसाठी विवेकभ्रष्ट झाला, [२५] लोलंगता २.५२- लंपटपणा [२६] तेणे जीव वारयावेधला २.६३- वात झाल्याप्रमाणे भ्रमिष्टासारखा वागू लागला,

तव तो पावला खंडेराव | आणी कुळस्वामिणी ||४७||

आतां मनोरथ पुरती | स्त्रीपुरुषें आनंदती |

सावध होऊन श्रोतीं | पुढें अवधान द्यावें ||४८||

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

स्वगुणपरीक्षा-२ नाम समास तिसरा || ३.३ ||

दशक ३ समास ३ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] रुक्याकारणे सांडी प्राण ३.२- पैशासाठी प्राण टाकी, [२] कदा कल्पांती न वेची ३.३- [कंजुषी] अगदी कठीण प्रसंगीही (जगबुडीची वेळ आली तरी) पैसा खर्च करेना, [३] सांचिलेचि पुन्हा सांची ३.३-साठलेल्या धनात पुन्हा भर घालू लागला, [४] सिंतरले ३.९- फसविले [५] भाणे ३.१०- बहिण,भांडे, [६] अकर्तव्ये हिंपुटी ३.१६- प्राप्त न झाल्याने दुःखी झाला [७]भोवती उठली वर्ढाणी ३.२३- त्याच्या सभोवती खूप घाण पसरली, [८] बरवी घरवात ३.३०- संसाराची सामग्री ( श्रीसमर्थांनी “पुन्हा” हा शब्द खोडून त्याजागी “बरवी”हा शब्द घातला ) [९] घरी आरंधे पडिले ३.३७- अनपत्यत्वदुःखामुळें घरामध्ये जणू अंधार पडला,

दशक ३ समास ४ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१]यावा ४.३- मिळकत,येणी [२] पती अवघीच मोडिली ४.१२- लोकात पत राहिली नाही,[३] डिवाळयाची ४.१२- दिवाळे निघण्याची, [४] रिणाइती ४.१५- सावकार [५] काये करणे देवा ४.१८- देवा आता काय करावे किंवा काय कारणाने देवा असे झाले.(गोरखपूर प्रतीत 'काय कारणे' असा पाठ आहे.) [६] कुसमुस ४.२४- कुरबुर,[७] स्त्री अत्यंत प्रीतीची/ तेहि सुखाच लागली ४.२६- बायको अत्यंत प्रेम करते पण आधी बहुदा स्वतःचेच सुख बघते, [८] प्रारब्धसूत्र तुकले रुणानुबंधाचे ४.३०- रुणानुबंधाच्या प्रारब्धाची/नशीबाची दोरी बळकट असल्यानेच केवळ वियोग होतोय ('तुकले' म्हणजे 'बळावल्याने' असा अर्थ घेऊन,पण'तुटले'असाही अर्थ काही ठिकाणी दिला आहे.) [९] ते पोटागि वेगळीच ४.३६- अंतःकरणातील कळकळ वेगळीच असते, [१०] दगदला ४.३७- दगदग झाली, [११]लांव ४.३९- दुष्ट [१२] मकरध्वजाचेनि ४.३९- कामविकाराने [१३]आहे साठी जन्माची ४.४२- जन्मभराची सोबती आहे.[१४] ऐसी वेवर्धना करी ४.४६- असे विचार मनात येऊ लागले, [१५] कानकोंडा झाला ४.४७- [देवकार्यासाठी] भिडस्त झाला, [१६] कुटुंबकाबाडी ४.४७- कुटुंबासाठी कष्ट [१७] झळंबला ४.४९- गुरफटला

संसार हा अति दुस्तर | तोचि ठाकून आला ||५५||

भगवद्भजनावांचुनी | चुकेना हे जन्मयोनी |

तापत्रयांची जाचणी | सांगिजेल पुढे ||५६||

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

स्वगुणपरीक्षा-४ नाम समास पाचवा || ३.५ ||

दशक ३ समास ५ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] बैसल्या अमृतकळा ५.४- गालफाडे बसली,[२] चंद्री लागली डोळां ५.४- डोळे निस्तेज झाले,[३] देखोनिया उभड आला ५.६- पाहून भडभडून आले, [४] अन्ना लागी मिडकली, झडा घालिती ५.७-अन्नासाठी हपापलेल्या मुलांनी अंगावर झडप घातली, [५] धादावली ५.९- अतिभुकेली [६] शंखतीर्थ ५.१९- बोंबमारली,[७] पापकळीं ५.२२-पापामुळें कलह [८] वस्तभाव ५.२८- चीजवस्तू [९] सव्य अपसव्य ५.३१– डावं उजवं गडबडा लोळणं, [१०] बृहती वाजो लागली ५.४१-गुदद्वारातून वारा सरु लागला.[११] वृद्धीस ५.५४- वृद्ध माणसास [१२] तापत्रय ५.५६- त्रिविधताप [१३] जाचणी ५.५६- त्रास

दशक ३ समास ६ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[१] आर्तभूत तोषला ६.२- आतुर / लोभी संतोष पावला, [२] पदार्थ जेवी ६.२- हवी असलेली वस्तु मिळाल्यावर, [३] बंदी पडल्याचे बंधन तोडता सुख ६.३- बंदीवानास मुक्त करताच त्यास सुख लाभते, [४] माहापुरे जाजावला ६.४- महापुरात सापडून घाबरलेला, [५] चेईला ६.४- जागे झाला [६] स्वप्न दुःखी ६.४- स्वप्नात दुःखी झालेला [७] वोखटे वर्ण काळफोड ६.१७- वाईट पण सडणारा व्रण व काळपुळी,[८] माहाजड ६.१७-अतिदुःखदायक,[९] अंगुळवेडे -बोटाचे नखुर्डे, [१०] भरे बलंगी ६.१८- दातातील खुसपट, [११] अंदु ६.२०- हाड्याव्रण, [१२] पेहाचेपोट ६.२०- जलोदर,पोटफुगी, [१३] बैसले टाळे ६.२०- कान ठिळया बसल्या, [१४] वोला कुष्ठ ६.२१- कुष्ठरोग,महारोग, [१५] पंड्य़ारोग ६.२१- रक्तक्षय, [१६] वाटी वटक वायगोळा ६.२२- पेटके, वांती गुबारा, [१७] वोलांडा वळ ६.२३- गरमी,गांठ [१८] माज आणि मान ६.२४- कंबर आणि मान, [१९] पुष्ठीग्रीवा ६.२४- पाठ व गळा, [२०] अस्तिसांदे ६.२४- हाडे व सांधे, [२१] मुरमा सुंढरे माळिणी ६.२४ - मुरुम, गळवे, नाकातील फोड,[२२] कुळिक,तरळ,कामिनी ६.२५- मोडशी, अजीर्ण, काविळ, [२३] जळसोस ६.२६- जलशोष,कोरड [२४] हिंवारे ६.२६- हिंवताप, [२५]

गिरिविरी ६.२६- चक्कर, [२६] अंधारे ६.२६- अंधारी येणे, [२७] पाचाव ६.२६- दृष्ट लागून दुखणे उलटणे, [२८] शरे ६.२६- थंडी वाजून कुडकुडणे, [२९]शैत्य ६.२७- थंडी, [३०] उष्ण ६.२७- उकाडा, [३१] तृषाक्षुधा ६.२७- तहानभूक,[३२] दिशा ६.२७- हगवण,[३३] विषयतृष्णा ६.२७- अतिसंभोगेच्छा, [३४] अपेसी ६.२८- अपयशी, [३५] मूत्रकोंड ६.२९- लघवी अडणे, [३६] खडाचढाचेनि ६.२९- मूतखडयामुळे [वेदना], [३७] उन्हाळे ६.३०- उन्हाळे लागणं, [३८] दिशा कोंडता आंदोळे ६.३०- शौच कोंडल्यामुळे जीवाची तगमग होणे,[३९] गांठी ढळली ६.३१- गांठ सरकली, [४०] भरला हिर लागला घास ६.३२- ठसका व घास लागणे, [४१] फोडी लागता ६.३२- फोडास धक्का लागताच,[४२] उसित गेला ६.३३- घशात घास अडकला, [४३] उलाटजाला ६.३३- वांती झाली, [४४] खरे पडसा ६.३३- तोंडयेऊन पडसे येणे, [४५] गळसोट्या जीभझडे ६.३६- गालगुंड/घटसर्प,जीभेचा कर्करोग [४६] जरंडी ६.३७- पाणथरी [४७] घोलाणा ६.३७- घोळणा, [४८] अंगुळा ६.३७- बोट, [४९] अधर जिव्हा रगडती ६.३८- ओठ,जीभ चावली जाते, [५०] गर्भांध ६.३९- जन्मांध, [५१] फुले ६.४०- डोळयात फुल पडणे, [५२] पडळे ६.४०-मोती/काच बिंदू, [५३] गर्ता ६.४०- अंधळा [५४] राखोंडे ६.४०- ओठ तुटके, [५५] थोटे

७.२३-खातापिता, [२१] दात कस्करे ७.२३- दात करकरणे [२२] हरळे ७.२३- दातात फटी पडणे, [२३] गालोरे ७.२५- गालगुञ्चे, [२४] ठुणके ७.२५-ठोसे, [२५] लासणे ७.२५- डागणे, [२६] चिमोरे ७.२५- चिमटे, [२७] धारकी ७.२५- धारेवर धरणे, त्रास देणे, [२८] कर्ण नासिक विंधले ७.२८- नाककानास भोकं पाडणं, [२९] काडे गर्गोड कर्कश ७.३२- कडू काढे चाटणं, [३०] ढाळ उखाळ ७.३३- जुलाब, वांती [३१] फाड रक्त फांसळी ७.३४- चिरफाड,रक्त काढणे, [३२] गुल्ल डागांची जाचणी ७.३४-तापलेल्या सळीने डाग देणे, [३३] हरंबळे ७.३९- तळमळे [३४] बणब्या, खडकुती ७.४२– वणवा लागतो ,वाळून जाती, [३५]युक्षदंड ७.४२- ऊस [३६] हारपे,सांडे ७.४५- हरवते, सांडते,[३७] पशूते चुकले ७.४६- जनावरे हरवली,[३८] मैंद ७.४९- लुटारु, [३९] खाणोरी ७.४९- घर खणून चोरी करणारे, [४०] सुवर्णपंथी भुररेकरी ७.४९- किमयागारी चोरटे, [४१] सिंतरु ७.४९- फसविणारे, [४२] वरपेकरी ७.४९- चोर दरवडेखोर [४३] गठीछोडे ७.५०- गाठोडे चोर, [४४] प्रजंनी ७.५१- पावसात, [४५] वोसाणे लाटा ७.५२- जलप्रवाहा बरोबर वाहात येणारा ओंडका,केरकचरा इ. [४६] अबद्ध मंत्रे ७.५५- चुकीच्या मंत्रजपामुळे [४७] कलाली ७.५८- एक पक्षी [४८] दिवटा सरवदा ७.५९- मशालीच्या उजेडात भविष्य-ज्योतिष सांगणारा, [४९] यातने वरपडा जाला ७.६२- वेदनेने,यातनेमुळे गांजून गेला, [५०] दरेमार ७.६३- दरीत ढकलणे, [५१] तळवेमार ७.६३- तापल्या तव्यावर उभं करून मारणे, [५२]

मोघरीमार ७.६५- लाकडी सोट्याने मारणं, [५३] बुधलेमार ७.६५- दारुच्या बुधल्यास बांधून मारणे, [५४] चौखरुन डंगारणेमार ७.६५- चारीबाजूस ताणून, बडगे हाणून मारणे, [५५] गुडघेमार ७.६५- गुडघ्यानी मारणे, [५६] तपरखा ७.६६-चपराकी मारणं, [५७]सेणमार ७.६६- शेण मारणे [५८] कानखडे ७.६६- कानात खडे खुपसणे, [५९] टांगणे टिपऱ्या पिछोडे ७.६७- टांगणे,चाप लावणे, मागे हात बांधणे, [६०] बुधनाल ७.६७- झाडाच्या बुंध्यावर नाला प्रमाणे वाकवून मार देणे, [६१] नाकवणी, चुनवणी, मीठवणी, रायवणी,गुळवणी ७.६८- चुना,मीठ,मोहरी, गूळ याचे पाणी नाकात, कानात ओतणे, [६२] भांड्यामुखे उडवणे ७.७२- तोफेच्या तोंडी देणे, [६३] कानी खुंट्या ७.७३- कानात खुंट्या मारणे, [६४] अपानी मेखा ७.७३- गुदद्वारात मेखा ठोकणे,[६५] भोत ७.७४- पोत्यात घालणे, [६६] बोटबोटी ७.७४- बोटे ठेचणं/ तोडणं, [६७] सांडस लाऊन आटाटी ७.७४-तप्त सांडशीने वृषण/स्तन दाबणे, [६८] विझप्रळये ७.७७- वीजा पडून, [६९] सीरा वोढून ७.७८- शीरा तोडणे, [७०]आपदा अनुपत्ति कदान्न ७.८१- वाईट अन्न खाण्याचं संकट, अनुपत्ती=विपत्ती [७१] आकांत वाखाप्रळये ७.८२- पटकीच्या साथीत अनेक माणसं मरणं, [७२] नाना कुवासे निर्बुजे ७.८६- विविध घाणेरड्या वासाने जीव गुदमरणं, [७३] अपार ७.८७- असंख्य,अगणित.

दशक ४ समास ९ मधील कठीण शब्दांचे / चरणांचे अर्थ व टिपा-

[*]आत्मनिवेदनभक्तिनिरुपण ४.९- छापील प्रतीत ’निरुपण’शब्द नाही. [१] तत्वे तत्व जेव्हां सरे ९.९- आत्मस्वरुपाचे ज्ञान झाल्यावर पंचभूता -त्मक देहातील तत्त्वे त्या आत्मतत्त्वातच लय पावतात. [२] नाथिली ९.१२ – लटकी,मिथ्या,[३] तत्वे साक्षत्वें वोसरती ९.१४- मी तत्वांचा साक्षी आहे म्हणजे ’मी’ तत्त्वापासून भिन्न आहे, ’मी’ तत्त्व नाही.”सर्वं खल्विदं ब्रह्म”अशी आत्मप्रतीती आली किं साक्षित्वच उरत नाही. आदिअंती एकच आत्मा आहे.आपण निराळे नाहीच.[४] चळण नाही ९.२६- चळत नाही, अचल, [५] चत्वार ९.२८- चार, [६] त्वंपद ९.२०- तत्त्वमसि या महावाक्यातील त्वंपद व तत्पद यांचा भेद असिपदाने काढून ’तें तू आहेस’ असे ऐक्य होऊन अवशिष्ट शुद्ध परब्रह्म उरते.

जयजय रघुवीर समर्थ ! श्रीराम जयरामजयजयराम !

श्रीराम समर्थ !!

१]प.पू.कल्याणस्वामींच्या हस्तलिखितावरुन छापलेल्या शके १९२९ सालच्या दुसऱ्या आवृत्तिवरुन सदर दासबोधाची तळटिपांसह संगणकावृत्ति तयार करुन,या संगणक आवृत्तिचे इतरांनी छापलेल्या प्रतींबरोबर तुलना करुन ती निर्दोष करण्याचा अटोकाट प्रयत्न केला आहे.

२] दशक व समासांची नांवे शक्यतोवर मूळ प्रतीत जी आहेत तीच ठेवली आहेत.परंतु काही नांवात थोडासा बदल केला आहे. अमूक नावाचा दशक/समास असं प्रत्येकवेळी सांगण्याची आवश्यकता नाही,म्हणून नावांबरोबर जोडलेला 'नाम' हा 'नावाचा'या अर्थाचा शब्द वगळला आहे.वाचकांनी या किरकोळ दुरुस्त्यासाठी क्षमा करावी.ज्या नावात बदल केला आहे ते शब्द तारांकित केले आहेत.त्याचं विवरण तळटिपात दिले आहे.

३] पुनरावृत्त नावापुढे दशकक्रमांक व समास क्रमांक दिले असून ,प्रत्येक समासाचा पान क्रमांक अनुक्रमणिकेत माहितीसाठी दिले आहेत.तसेच तळटिपात प्रत्येक शब्दांसमोर समासक्रमांक व ओवीक्रमांक दिले आहेत.यामुळे हवा तो समास,ओवी व शब्द शोधणे सुलभ होईल

४] दासबोधात आलेले संस्कृत श्लोकांना अनुक्रमांक दिले आहेत. श्लोकापुढील अंक त्या समासातील श्लोकांची संख्या दर्शवतो-इति स.भ.पु.ज्ञा.कुलकर्णी,पुणे.]

